RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ४०(२)] मंगळवार, मे १९, २०२०/वैशाख २९, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ मे २०२०.

### आदेश

**महाराष्ट्र दारूबंदी कायदा.**

क्रमांक एफएलआर-०५२०/कोविड/प्र.क्र.४/राउशु-२.—महाराष्ट्र दारूबंदी कायदा (१९४९ चा २५ वा) चे कलम १३९ च्या उपकलम (१) चा खंड (सी) नुसार महाराष्ट्र शासनास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत मंजूर केलेल्या अनुज्ञप्ती नमुना एफएल-३ अनुज्ञप्तीधारक सदर अनुज्ञप्तीच्या जागेत ग्राहकांना किंवा निवासी व्यक्तींना मद्य प्राशन करण्यास देण्याच्या तरतूदीपासून खालील शर्तीच्या सूट देण्यात येत आहे :—

**शर्ती**

१. नमुना एफएल-III अनुज्ञप्तीमधून दि. २४ मार्च, २०२० रोजी शिल्लक असलेला मद्यसाठा सीलबंद अवस्थेत परवानाधारकांस विकता येईल.

२. संबंधित एफएल-III अनुज्ञप्तीधारक विशेष पासान्वये बियरचा साठा एफएल/बीआर-II अनुज्ञप्तीधारकांस एक वेळ विक्री करू शकेल. परंतु, यासाठी एफएल/बीआर-II अनुज्ञप्तीधारकांची मंजूरी असणे आवश्यक राहील.

३. परवानाधारकांस एफएल-III च्या ठिकाणी मद्यप्राशन करण्यासाठी विक्री करता येणार नाही.

४. सदरची परवानगी शिल्लक असलेला मद्यसाठा संपेपर्यंत अथवा लॉकडाऊन कालावधी यापैकी जे अगोदर होईल ते यापुरतीच मर्यादित राहील.

५. लॉकडाऊन कालावधीत सदर एफएल-III अनुज्ञप्तीत नवीन मद्यसाठा आणता येणार नाही.

६. मद्यविक्री करताना कोव्हिड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी सर्व खबरदारी घेणे अनुज्ञप्तीधारकाची जबाबदारी राहील.

७. राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ (२००५ चा ५३ वा कायदा) किंवा राज्यात लागू असलेल्या इतर कायद्यान्वये जारी केलेले लॉकडाऊनचे आदेश अस्तीत्वात असेपर्यंत हे आदेश लागू व अस्तीत्वात राहतील.

८. सदरचे आदेश रद्द करणे किंवा मागे घेणे याबाबत शासनाचे सर्व अधिकार अबाधित राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वल्सा नायर सिंह,**

शासनाचे प्रधान सचिव (राज्य उत्पादन शुल्क).

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Raiguru Chowk,
Mumbai 400032, dated the 19th May, 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.FLR-0520/COVID/C.R.4/EXC-2.—In exercise of the powers conferred by clause (C) of sub-section (1) of section 139 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby exempts the person holding licence in Form FL-III as appended to the Bombay Foreign Liquor Rules, 1953, from the provisions of the said rules, so far as it relates to the provisions of the licence of sale for on consumption to residents or boarders under the said rules, subject to the conditions as specified hereunder, namely:—

## CONDITIONS

1. Closing stock of Foreign Liquor as on the 24th March 2020, at the FL-III licence may be sold to valid permit-holder in sealed bottles for "off consumption".

2. On consent from the Licence in Form FL/BR-II, the FL-III licence-holder may sell his remainder of Beer Stock as a one-time measure to the relevant FL/BR-II licence-holder on a special transport pass.

3. There shall not be sale for on consumption at the FL-III licence premises.

4. This exemption shall be in force until the Lockdown period or the liquor stocks last, whichever is earlier.

5. The FL-III licence-holder shall not procure fresh liquor stocks till the lockdown lasts.

6. The licence-holder shall take all due precaution to prevent the spread of the disease of COVID-19 by ensuring due care in hygiene and sanitisation.

7. This Order shall be in force and effective until the orders of Lockdown issued by the Government, from time to time, under the Disaster Management Act, 2005 or any other Act in force in the State.

8. The Government may, at any time and at its discretion, either modify or rescind the same.

By order and in the name of the Governor of Maharahstra,

VALSA NAIR SINGH,

Principal Secretary (Excise) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.